## L. A. BILL No. III OF 2023.

A BILL
TO AMEND THE DR. BABASAHEB AMBEDKAR TECHNOLOGICAL UNIVERSITY ACT, 2014 AND THE MAHARASHTRA COEP TECHNOLOGICAL UNIVERSITY ACT, 2022.

**सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३.**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ अधिनियम, २०१४ आणि महाराष्ट्र सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ अधिनियम, २०२२ या अधिनियमांमध्ये सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक २ मार्च, २०२३ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**(विधानपरिषदेने दिनांक १५ मार्च, २०२३ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

२०१४ चा महा. २९. २०२२ चा महा. ३५.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ अधिनियम, २०१४ आणि महाराष्ट्र सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ अधिनियम, २०२२ या अधिनियमांमध्ये सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या चौऱ्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

प्रकरण एक

**प्रारंभिक.**

संक्षिप्त नाव. **१.** या अधिनियमास, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ आणि महाराष्ट्र सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ (सुधारणा) अधिनियम, २०२३, असे म्हणावे.

प्रकरण दोन

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ अधिनियम, २०१४ याची सुधारणा.**

सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम १३ ची सुधारणा.

**२.** डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ अधिनियम, २०१४ याच्या कलम १३ मध्ये,— २०१४ चा महा. २९.

(१) पोट-कलम (१) मधील,—

(क) खंड (क) मध्ये,—

(एक) " एक समिती " या मजकुराऐवजी, " एक शोध-नि-निवड समिती " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) उप-खंड (एक) ऐवजी, पुढील उप-खंड दाखल करण्यात येईल :—

" (एक) कुलपतीने नामनिर्देशित केलेला सदस्य, जो उच्च शिक्षण क्षेत्रातील विख्यात व्यक्ती असेल आणि जो एकतर, शिक्षण क्षेत्रातील राष्ट्रीय ख्यातीची विख्यात विद्वान व्यक्ती किंवा पद्म पुरस्कारप्राप्त व्यक्ती असेल ;" ;

(तीन) उप-खंड (तीन) नंतर, पुढील उप-खंड समाविष्ट करण्यात येईल :—

" (चार) विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अध्यक्षाने नामनिर्देशित केलेला सदस्य ;" ;

(ख) खंड (ग) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

" (ग) समितीवर नामनिर्देशित केलेले सदस्य, अशा व्यक्ती असतील की ज्या, विद्यापीठाशी किंवा विद्यापीठाच्या कोणत्याही महाविद्यालयाशी किंवा कोणत्याही मान्यताप्राप्त परिसंस्थेशी कोणत्याही रीतीने संबंधित असणार नाहीत ;" ;

(ग) खंड (घ) मधील, " तीन " हा मजकूर वगळण्यात येईल ;

(२) पोट-कलम (४) मधील,—

(क) खंड (ख) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येतील :—

" (ख) उच्चस्तरीय क्षमता, सचोटी, नैतिकता व संस्थात्मक बांधिलकी असलेली व्यक्ती असेल ; आणि कोणत्याही विद्यापीठात प्राध्यापक म्हणून किमान दहा वर्षांचा अनुभव असलेला किंवा शैक्षणिक नेतृत्त्व सिद्ध केल्याच्या पुराव्यासह लौकिकप्राप्त संशोधन किंवा शैक्षणिक प्रशासकीय संघटनेतील दहा वर्षांचा अनुभव असलेला विख्यात शिक्षणतज्ज्ञ असेल ;" ;

(ख) खंड (ङ) मधील, " शैक्षणिक अर्हता " या मजकुराऐवजी, " अतिरिक्त शैक्षणिक अर्हता " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(३) पोट-कलम (६) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :—

" (६क) जर कुलपतीने निवड केलेली व्यक्ती, कुलगुरू पदाचा कार्यभार स्वीकारीत नसेल तर, कुलपतीस, नामिकेतील उर्वरित व्यक्तींमधून अन्य सुयोग्य व्यक्तीची निवड करता येईल किंवा त्यास, एकतर त्याच समितीकडून किंवा या प्रयोजनासाठी नवीन समिती घटित केल्यानंतर, अशा नवीन समितीकडून, नवीन नामिकेची मागणी करता येईल .".

प्रकरण तीन

**महाराष्ट्र सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ अधिनियम, २०२२ याची सुधारणा.**

२०२२ चा महा. ३५.

सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५ याच्या कलम ११ ची सुधारणा.

**३.** महाराष्ट्र सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ अधिनियम, २०२२ याच्या कलम ११ मध्ये,—

(१) पोट-कलम (३) मधील,—

(क) खंड (क) मध्ये,—

(एक) उप-खंड (एक) ऐवजी, पुढील उप-खंड दाखल करण्यात येईल :—

" (एक) कुलपतीने नामनिर्देशित केलेला सदस्य, जो उच्च शिक्षण क्षेत्रातील विख्यात व्यक्ती असेल आणि जो एकतर, शिक्षण क्षेत्रातील राष्ट्रीय ख्यातीची विख्यात विद्वान व्यक्ती किंवा पद्म पुरस्कार प्राप्त व्यक्ती असेल ;";

(दोन) उप-खंड (तीन) नंतर, पुढील उप-खंड समाविष्ट करण्यात येईल :—

" (चार) विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अध्यक्षाने नामनिर्देशित केलेला सदस्य ; " ;

(ख) खंड (ग) मधील, " तीन " हा मजकूर वगळण्यात येईल ;

(ग) खंड (घ) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

" (घ) समितीवर नामनिर्देशित केलेले सदस्य, अशा व्यक्ती असतील की ज्या, विद्यापीठाशी किंवा विद्यापीठाच्या कोणत्याही महाविद्यालयाशी किंवा कोणत्याही मान्यताप्राप्त परिसंस्थेशी कोणत्याही रीतीने संबंधित असणार नाहीत ; " ;

(घ) खंड (च) मध्ये,—

(एक) उप-खंड (एक) पूर्वी, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

" (एक-१) उच्चस्तरीय क्षमता, सचोटी, नैतिकता व संस्थात्मक बांधिलकी असलेली व्यक्ती असेल ;";

(दोन) उप-खंड (चार) मध्ये,—

(१) " शैक्षणिक अर्हता " या मजकुराऐवजी, " अतिरिक्त शैक्षणिक अर्हता " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(२) परंतुकामधील, " शैक्षणिक अर्हता " या मजकुराऐवजी, " अतिरिक्त शैक्षणिक अर्हता " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(२) पोट-कलम (४) मधील,—

(क) विद्यमान परंतुकापूर्वी, पुढील परंतुक समाविष्ट करण्यात येईल :—

" परंतु, जर कुलपतीने निवड केलेली व्यक्ती, कुलगुरू पदाचा कार्यभार स्वीकारीत नसेल तर, कुलपतीस, नामिकेतील उर्वरित व्यक्तींमधून अन्य सुयोग्य व्यक्तीची निवड करता येईल किंवा त्यास, एकतर त्याच समितीकडून किंवा या प्रयोजनासाठी नवीन समिती घटित केल्यानंतर, अशा नवीन समितीकडून, नवीन नामिकेची मागणी करता येईल : " ;

(ख) विद्यमान परंतुकामधील, " परंतु " या मजकुराऐवजी, " परंतु आणखी असे की, " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३.]**

**[ डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ अधिनियम, २०१४ आणि महाराष्ट्र सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ अधिनियम, २०२२ या अधिनियमांमध्ये सुधारणा करण्यासाठी विधेयक. ]**

**[श्री. चंद्रकांत (दादा) पाटील,**
उच्च व तंत्र शिक्षण मंत्री.**]**

**[ विधानसभेने दिनांक २ मार्च, २०२३ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**[ विधानपरिषदेने दिनांक १५ मार्च, २०२३ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई